**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.38, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, NOV-DEC, 2019, VOL- 7/55*

# भारतीय राज्य घटना—एक दस्तऐवज

**विजय जनार्दन चव्हाण**

*सहयोगी प्राध्यापक एस.एन.डी.टी.,शिक्षणशास्त्र महाविद्यालय कर्वे रोड, पुणे—४*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

आम्ही भारतातील सर्व नागरिक सार्वभौम लोकतंत्रात्मक प्रजासत्ताकाचा स्वीकार करतो या देशातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय विचार, उच्चार, विश्वास,श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जा व संधी याची समानता मिळवून देण्यास व व्यक्तिगत प्रतिष्ठा व राष्ट्रीय ऐक्य वृध्दींगत करणारा बंधुभाव निर्माण करण्यास वचनबध्द होत आहोत अशी प्रतिज्ञा आपण रोज म्हणतो. कारण लोकशाही प्रधान देशाचे आपण नागरिक आहोत याचा आपण गौरव करतो.

दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना लिहून पूर्ण झाली व २६ जानेवारी १९५० पासून या भारतामध्ये लागू झाली. या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अथक परिश्रम घेवून २वर्षे ११ महिने आणि १८ दिवसामध्ये राज्यघटना लिहून पूर्ण केली.

१६ मे १९४६ मध्ये कॅबिनेट मिशनमध्ये निर्मितीची योजना तयार केली. २९ ऑगस्ट १९४७ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समितीची स्थापना झाली. ९ डिसेंबर १९४६ ते ऑगस्ट १९४७ पर्यंत राज्यघटनेबाबत ५ अधिवेशने बोलविली गेली. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना संमत झाली व २६ जानेवारी १९५० पासून या राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली.

भारतातील राज्यघटनेत सरनामा २२ भाग, ३९५ कलमे (अनुसूची यांचा सामवेश होता, सध्या एक सरनामा २५ भाग, ४६५ कलमे आणि १२ अनुसूची समाविष्ट आहेत. राज्यघटना ‘Constitution’ ही संज्ञा ‘Consituere’ या लॅटिन शब्दावरुन आली आहे, ज्याचा अर्थ स्थापन करणे, निर्माण करणे किंवा रचणे असा होतो) फ्रेंच भाषेत ‘Constitution’ हा शब्द नियमन व आज्ञावली साठी वापरला जावू लागला.

राज्यघटना लिखित व विस्तृत आहे. अंशत: परिवर्तनीय व अंशत: परिदृढ आहे. संसदीय शासन प्रणाली व संघराज्य प्रणाली असणारी, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ हे शासनाचे तीन भाग या राज्यघटनेमध्ये आहेत. मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्व व कर्तव्याचा समावेश असणारी ही भारताची राज्यघटना आहे. याशिवाय राजकीय प्रक्रिया सुरुळीत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोगाची रचना ही या राज्यघटनेमध्ये केलेली

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

आहे. या राज्यघटनेने स्वतंत्र भारताच्या नव्या स्वरुपास आकार देऊन मूल्यांना स्थान दिले आहे व राष्ट्रीय ध्येयाची परिपूर्णता शिक्षणाद्वारे कशी होईल याचा ही विचार केलेला आहे. या राज्यघटनेने लोकशाहीला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानून सामाजिक परिवर्तनाला नवी दिशा दिली आहे. त्यातूनच धर्मनिरपेक्षता, समाजवाद न्याय, स्वातंत्रय, समता, बंधुता, अखंडता या महत्वपूर्ण संकल्पना पुढे आल्या आहेत. लोकशाही एक जीवनपध्दती मानून लोकांद्वारे शासन या बरोबच नैतिक, आर्थिक व सामाजिक अर्थ ही तिला प्राप्त करुन दिले आहेत व मूलभूत हक्क व कर्तव्यही ठरविली आहेत. या सर्व गोष्टींना शिक्षणाशी जोडून योग्य पध्दतीने तिचा अंगिकार करावा हेही ठरविले आहे. यामध्ये संविधानाचे पालन करणे, तत्वप्रणित आदर्श संस्था व राष्ट्रगीत यांचा आदर्श बाळगणे राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयात स्फुर्ती व उदात्त आदर्शाची जोपासना करुन त्याचे अनुकरण करणे या गोष्टींना विशेष स्थान दिले आहे. त्यामुळे सार्वभौम एकता व एकात्मता उन्नत राखणे व संरक्षण करणे, धार्मिक भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलिकडे जावून भारतीय जनतेमध्ये एकोपा व मातृभाव वाढीस लावणे, स्त्रीयांच्या प्रतिष्ठेला धोका पोहविणाऱ्या प्रथा सोडून देणे व विज्ञाननिष्ठ समाज, मानवतावाद व शोधक बुध्दी व सुधारणावाद यांचा विकास करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, हिंसाचाराचा निग्रहपूर्व त्याग करणे, याबाबतच्या मूलभूत कर्तव्यामध्ये ही उदिदष्टे स्पष्ट केलेली आहेत.

न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधूता ही चार आधारभूत तत्वे भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेली आहेत व या तत्वानुसारच कर्तव्य आणि हक्काबाबत प्रत्येक व्यक्तीला अधिकारही प्राप्त करुन दिलेले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील राज्यघटनांचा सखोल अभ्यास करुन आदर्श स्वरुपाची ही राज्यघटना बनविलेली आहे. यामध्ये संसदीय लोकशाही इंग्लंडच्या राजघटनेवरुन, पंचवार्षिक व समाजवाद रशियन राज्यघटनेवरुन, मुलभूत हक्क फ्रेंच व अमेरिकेच्या राज्यघटनेवरुन, मार्गदर्शक तत्वे आयरीश व म्यानमारच्या राज्यघटनेवरुन मुलभूत कर्तव्ये जपान घटना दुरुस्ती, दक्षिण अफ्रिकेच्या राज्यघटनेवरुन आणिबाणी, जर्मन राज्यघटनेवरुन संघ राज्याची कल्पना, अमेरिका व कॅनडा यांच्याकडून न्यायिक पुर्नविलोकन अमेरिकेकडून समवर्ती सूची ऑस्ट्रेलियाकडून वसंघसूची कॅनडाच्या राज्यघटनेवरुन घेतली आहे. अशा प्रकारे जगातील अनेक देशांच्या राज्यघटनेचा अभ्यास करुन भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली गेली आहे.

भारतीय संविधानाचा भाग—३,कलम १२ ते ३५ मुलभूत अधिकारा— बाबत आहे. हे हक्क व्यक्तीच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक आहेत. ज्यामध्ये समानतेचा हक्क कलम १४ ते १८ मध्ये आहे. यामध्ये सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता आहे. अस्पृश्यता निर्मलून आहे. स्वातंत्र्याचा अधिकार कलम १९ ते २२यामध्ये भाषण स्वातंत्र्यासारख्या काही अधिकाराचे

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies


संरक्षण, गुन्हयासाठी शिक्षेच्या संदर्भात संरक्षण, जिवितहानी, वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण, अटक आणि स्थानबध्द करण्याविरुध्द संरक्षण याचा या कलमामध्ये समावेश आहे.

अत्याचाराविरुध्द अधिकार कलम २३ आणि २४ मध्ये मानवी तस्करी आणि सक्तीच्या नोकरीविरुध्द प्रतिबंध करावयाचे इ.मध्ये मुलांच्या रोजगारावर प्रतिबंध, धर्मस्वातंत्र्याचा अधिकार कलम २५ ते २८ विवेक आणि मुक्त व्यवसायाचे स्वातंत्र्य धर्माचे पालन आणि प्रसार, धार्मिक कामकाजाचे स्वातंत्र्य, कोणत्याही विशिष्ट धर्माचा प्रचार करण्यासाठी कर न भरण्यासाठीचे स्वातंत्र्य, काही शैक्षणिक संस्थामध्ये धार्मिक प्रार्थना किंवा धार्मिक पुजेमध्ये उपस्थित न रहाण्याचे स्वातंत्र्य यांचा समावेश आहे.

सांस्कृतिक आणि शैक्षणिक कलम १९ आणि ३० यामध्ये अल्पसंख्याकांच्या हितसंबंधांचे स्वातंत्र्य, अल्पसंख्यांकाना शैक्षणिक संस्था स्थापित करण्याचा आणि चालविण्याचा अधिकार याबाबतीत घटनात्मक उपायाद्वारे करण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करण्यासाठी उपाय व राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे भाग—४, कलम ३६ ते ५१ पर्यंत राज्यधोरणाविषयी मार्गदर्शक तत्वाबद्दलची माहिती आहे. राज्यघटनेमध्ये मुलभूत कर्तव्यांचाही समावेश केलेला आहे. कलम ५१—अ मध्ये सर्व भारतीय नागरिकांसाठी एकूण ११ मुलभूत कर्तव्यांचा समावेश आहे. शिक्षणामध्ये घटनेची मुलभूत तत्वे व भारतीय राज्यघटनेची उदिदष्टये या दृष्टीकोनातून अभ्यासक्रम रचनेमध्ये बदल केलेले आहेत. मूल्य, गाभा घटक व जीवनकौशल्य हा त्याचाच एक भाग आहे.

अशा प्रकारे भारतीय राज्यघटना एक आदर्श राज्यघटना म्हणून लागू केलेली आहे. तिचे स्वरुपपुढीलप्रमाणे आहे.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies




**संदर्भः—**

*भारताची राज्यघटना, व्यावसायिक नितीमुल्ये आणि मानवी हक्क, प्रवीणकुमार, मेल्सवेली.* *SAGE Publication India Pvt. Ltd., New Delhi- 110044*